## अंबरनाथ नगरपरिषदेची धार्मिक स्थळांवर कार्यवाही

सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक जागेवरील धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. सदर आदेशाचे पालन करीत अंबरनाथ नगरपरिषदेने शुक्रवार दि. २३/१२/२०१६ रोजी सार्वजनिक जागेवरील चार मंदिरे पाडण्याची कार्यवाही केली. अंबरनाथ शहराच्या पूर्व भागातील ग्रीन सिटी येथील देवीचे मंदिर, होलार सोसायटी येथील हनुमान मंदिर, बी-केबिन येथील हनुमान मंदिर आणि अंबरनाथ पश्चिम भागातील विम्को नाका येथील साईबाबा मंदिर अशा चार मंदिरांवर ही कारवाई करण्यांत आली. यावेळी स्थानिक नागरिक आणि भाविकांनी या कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र कारवाईसाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यांत आल्याने कारवाईमध्ये कुणीही अडथळा आणला नाही.

अतिक्रमण विरोधी पथकप्रमुख श्री.संदिप कांबळे, श्री.नरेंद्र संख्ये, श्री.देवसिंग पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यवाही करण्यांत आली.

## नागरिकांना आवाहन




मा.जिल्हाधिकारी श्री.महेंद्र कल्याणकर यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व अंबरनाथ नगरपरिषद यांनी सर्व नागरिकांना कॅशलेस ट्रान्झॅक्शन करणेबाबत आवाहन करण्यात आले आहे. कॅशलेस ट्रान्झॅक्शनबाबत जनजागृती करण्याकरीता नगरपरिषदेतर्फे शहरांमध्ये विविध ठिकाणी या विषयाचे बॅनर लावण्यांत आले आहेत.